# अधिसूचना

उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय
७, निलगिरी बंगला, क्विन्स गार्डन, अल्पबचत भवनमागे,
पुणे ४११००१.
दि. ०८/०९/२०२०

भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक९७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा)अधिनियम २०१८ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना.

क्रमांक उपविअ-हवेली /भूसं./कावि/५७४ /२०२० ज्याअर्थी,भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३चा ३०)याच्या कलम ३ च्या खंड(इ) च्या परंतु काव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२) /अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्रकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, पुणे जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमिनी असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे )आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे,असे वाटते,ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यात भाग पाडणारी कारणे,यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१)अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम(४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुध्दिपुरस्सर उल्लधंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच , उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५)अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र )नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे ) याच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग पुणे यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

जिल्हा-पुणे, तालुका- हवेली, मौजे-बाणेर

| भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (चौ.मी. ) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १२१ पैकी | ३२७.६० | ६९ | १२५ब | १२० | १२२ |
| १२० पैकी | ३४.०७ | १२१ | ११९ | १२० | १२० |
| १२२ पैकी | ७९.२० | ६९ | १२६ | १२१ | १२३ |
| १ पैकी | ६.९० | १ | १ | १ | १ |
| ३ पैकी | ५६९.०६ | नाला | ३ | नाला | ४ |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव : हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-३ या प्रकल्पातील मेट्रो स्टेशनचे स्टेअरकेस एरिया व रनिंग सेक्शन करता.

प्रकल्पाचे वर्णन : विशेष सार्वजनिक वाहतुकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प.

समाजाला मिळणारे लाभ : हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.

## अनुसूची- चार

सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश : भूमिसंपादन,पुनर्वसन पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०)महाराष्ट्र राज्याला लागू असताना (महाराष्ट्र सुधारणा )अधिनियम ,२०१८ याच्या कलम १०(क)नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन राजपत्रतील अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२० /प्र.क्र.०२ /अ-३, दिनांक ११ जून २०२० अन्वये प्रकरण २ व ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : आवश्यकता नाही.
(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : आवश्यकता नाही.
(क) ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : आवश्यकता नाही.

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय ७, निलगिरी बंगला, क्विन्स गार्डन, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१ येथे निरीक्षण करता येईल.

दिनांक : ०८ /०९/ २०२०
ठिकाण : पुणे.

उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग पुणे / SUB DIVISIONAL OFFICER, HAVELI SUB DN. PUNE

(सचिन बारवकर)
उपविभागीय अधिकारी हवेली,
उपविभाग पुणे